जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in





६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड,
सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
ऑफिस मो. : ८२६२०५६४८०
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖
**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
: सौ. सुनंदा एस. चोरडिया



❖ वर्ष ५७ वे ❖ अंक ९ वा ❖ मे २०२६ ❖ वीर संवत २५५२ ❖ विक्रम संवत २०८२


या अंकात


| | पान नं. |
|---|---|
| • आमदार मंगल प्रभात लोढा यांच्या विधानास समाजातून तीव्र विरोध | १५ |
| • ।। जिनेश्वरी ।। अध्याय ६ – क्षुल्लक निर्ग्रंथीय | १९ |
| • कव्हर तपशील | २६ |
| • आओ दुर्ध्यान छोडें – २३ : स्नेह भाव | ३१ |
| • बिने जाने कित जाऊँ – प्रश्नोत्तरी प्रवचन | ३५ |
| • धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | ३८ |
| • ज्ञानाचे पाच प्रकार | ४३ |
| • जिनवाणीचे सार काव्यातून | ४७ |
| • वन मिनीट प्लीज | ४८ |
| • संसार | ४९ |
| • चिंता का मूल | ५१ |
| • जिंदगी को फरियादों की फाईल मत बनाओ | ६३ |
| • कडवे प्रवचन | ६५ |
| • ऐसी हुई जब गुरुकृपा – छांव कर | ६६ |
| • जैन सकल संघ – रक्तदान | ६८ |
| • जीवन और धर्म कला | ६९ |
| • जागृत विचार | ७२ |
| • हास्य जागृती | ७३ |
| • नफरत V/s प्यार | ७४ |
| • विश्व नवकार दिवस – दिल्ली | ७९ |
| • श्री श्वेतांबर स्थानकवासी जैन सकल संघ | ८० |
| • स्कैन लॅब डायग्नोस्टीक सेंटर, पुणे | ८१ |
| • अभय प्रभावना – धाडिवाल परिवार मिलन समारोह | ८२ |
| • जडाबाई दुगड शिक्षण संकूल, पुणे | ८३ |
| • सूर्यदत्त – जैनाचार्य युगभूषणसूरीजी म.सा. | ८५ |
| • जैन जागृति – अंक प्रकाशन | ९१ |
| • निळकंठ ज्वेलर्स, पुणे | ९१ |
| • C.A. महावीर चानोदिया – अध्यक्ष | ९२ |

- कु. साक्षी छाजेड – हायरोक्स स्पर्धा ९२
- विश्व द्रोहा कडून, विश्व शांती कडे ९३
- जितो पुणे – स्थापना दिन ९४
- नगरसेविका सौ. मनीषा चोरबेले अध्यक्षपदी ९५
- बोरा परिवार राष्ट्रीय संमेलन, पुणे ९६
- डायग्नोपिन छ. संभाजीनगर – उद्घाटन ९७
- महावीर की रोटी, उंड्री चौक – उद्घाटन ९८
- श्री. सतीशजी सुराणा – निवड ९८
- भगवान महावीर जन्म कल्याणक, पुणे ९९
- प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट – चिंचवड १०३
- ज्ञान : आत्मा की पहचान १०४
- सुरक्षा १०६
- विविध धार्मिक, सामाजिक बातम्या


जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र साठी)

❊ वार्षिक वर्गणी – रु. ८०० ❊ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २३००

जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र बाहेर)

❊ वार्षिक वर्गणी – रु. ९०० ❊ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २६००

''मॅगझिन पोस्ट'' द्वारा बंद पाकिटातून मासिक घरपोच पोहचण्याची १००% हमी.

या अंकाची किंमत ५० रु. • Google Pay - M. 9822086997

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा.
- 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/Google Pay - M. 9822086997/ AT PAR चेक/पुणे चेकने/RTGS इत्यादी द्वारा पाठवावी

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**

Bank : STATE BANK OF INDIA • Branch : Market Yard, Pune 37.

Current A/c No. : 10521020146 • IFS Code : SBIN0006117


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२-१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

## जैन समाज हा हिंदू संस्कृतीचा भाग असून अल्पसंख्यांक दर्जा झुगारण्याची वेळ आली आहे – आमदार श्री. मंगल प्रभात लोढा

# महाराज साहब, व्यक्ती व संस्थांकडून तीव्र विरोध

गत महिन्यात कॅबीनेट मंत्री श्री. मंगलप्रभातजी लोढा यांनी जैन धर्म हा हिंदू संस्कृतीचा भाग आहे आणि त्याने अल्पसंख्यांक दर्जा सोडण्याचा विचार करावा तसेच अल्पसंख्यांक दर्जा मागे घेण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरु करण्या बाबतचा विचार व्यक्त केला होता. या विधानात जैन समाजातून तीव्र विरोध करण्यात आले. महाराज साहब, गुरुदेव, विविध संस्थांनी याबद्दल तीव्र भावना व्यक्त करून आपल्या निषेधाचा पत्र त्यांना पाठविले आहे. जैन जागृति ऑफिसमध्ये विविध संस्थेनी पत्र पाठविले आहे. यापैकी ३ संस्थेचे पत्र येथे प्रसिद्ध केले आहे.

## अरिहंत जागृती मंच, पुणे

नामदार श्री. मंगलप्रभातजी लोढा
कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र सरकार, मुंबई

मा. महोदय,

जय जिनेंद्र.

''जैन समाज हा हिंदू संस्कृतीचा भाग असून अल्पसंख्याक दर्जा झुगारण्याची वेळ आली आहे असे आपण केलेले वक्तव्य नुकतेच वाचनात आले. ही गोष्ट आम्हांला अमान्य आहे. हिंदू हा शब्द आता संस्कृती वाचक न राहता धर्मवाचक झालेला आहे. वैदिक धर्माला सध्या हिंदू धर्म असे संबोधले जाते. याचाच अर्थ आपण सध्या हिंदूंशी जोडून घेणे म्हणजे संस्कृतीशी नसून हिंदू धर्माशी जोडून घेणे असा होतो. जैन धर्म हा एक प्राचीन स्वतंत्र भारतीय धर्म असून त्याला मोठा इतिहास आहे आणि जैन धर्माचे स्वतंत्र अस्तित्व कायम राहणे आवश्यक आहे. त्यामुळे आपले विधान अयोग्य व दिशाभूल करणारे आहे.

जैन समाजाला मिळालेला अल्पसंख्यांक दर्जा ही कुणाची कृपा नसून तो संविधानिक अधिकार आहे. हा अधिकार धार्मिक अस्मितेचे कवच आहे तसेच शैक्षणिक संस्था आणि पवित्र स्थळांना अतिक्रमण आणि इतर बाह्य हस्तक्षेपांपासून संरक्षण देण्यासाठी कायदेशीर संरक्षण आहे. हा सांस्कृतिक स्वायत्ततेचा प्रश्न आहे. तुमच्या वक्तव्यामुळे संपूर्ण जैन समाजात तीव्र असंतोष आणि असुरक्षितता निर्माण झाली आहे.

जैन समाजाला राष्ट्रीय अल्पसंख्याक दर्जा मिळविण्यासाठी जैनांनी मोठा लढा दिला आहे. त्यासाठी अरिहंत जागृती मंचाने विशेष प्रयत्न केलेले आहेत. आपल्यासारख्या श्रीमंत लोकांना अल्पसंख्यांक दर्जामुळे मिळणारे लाभ नको असतील, परंतु जैन समाजात असे अनेक आर्थिक दृष्ट्या गरीब लोक आहेत की ज्यांना अल्पसंख्यांक दर्जामुळे मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घेणे आवश्यक आहे.

जैन धर्म हा एक स्वतंत्र व प्राचीन धर्म असून कोणत्याही धर्माची शाखा नाही, याचा प्रचार आणि प्रसार करण्याचे उद्दिष्ट ठेवून अरिहंत जागृती मंच गेली २२ वर्षे हे कार्य करत आहे. जैन धर्माचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवणे हे जैन धर्मियांची अस्मिता आहे, असे आम्ही मानतो. याविषयी आमच्या भावना तीव्र आहेत. तुम्ही तुमचे हे अव्यवहार्य विधान ताबडतोब मागे घ्या आणि जाहीर माफी मागा अशी आमची मागणी आहे.

जैन धर्मावर अन्याय करणाऱ्या आपल्या वक्तव्याचा आम्ही तीव्र निषेध करतो.

राजेंद्र सुराणा, अध्यक्ष,
अरिहंत जागृती मंच, पुणे ●

## श्री नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड

मा. नामदार श्री. मंगलप्रभातजी लोढा
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री,
मुंबई - ४०००२६

सस्नेह जयजिनेंद्र,

आपण काही दिवसांपूर्वी जैन धर्म हा हिंदू संस्कृतीचा भाग आहे आणि त्याने अल्पसंख्यांक दर्जा सोडण्याचा विचार करावा तसेच अल्पसंख्यांक दर्जा मागे घेण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरु करण्याबाबतचा विचार व्यक्त केला होता. वास्तविक जैन धर्म हा स्वतंत्र धर्म असून या धर्माला वंदनीय अशा २४ तीर्थंकरांची परंपरा आहे. स्वतःची तत्वमिमांसा आणि मोक्षपरंपरा आहे. तसेच जैन धर्म हा कोणत्याही धर्माची शाखा किंवा उपशाखा नाही. आम्ही हिंदू संस्कृतीचे पालनकर्ते आहोत, आदरकर्ते आहोत पण धर्म आणि संस्कृती या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. आपला जैन धर्म हा स्वतंत्र धर्म आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य व अपरिग्रह या पाच महाव्रतांवर व सिद्धांतांवर जैन धर्माचा पाया उभारलेला आहे. अहिंसा हा जैन धर्माचा मूलमंत्र असून जो केवळ मनुष्यच नव्हे तर सुक्ष्म जीवाच्या प्रतीसुद्धा दयाभाव ठेवतो. तसेच अहिंसे सोबत कर्म सिद्धांताला महत्व देणारा प्राचीन धर्म आहे. २४ वे तीर्थंकर भगवान वर्धमान महावीर स्वामी यांच्या अगोदर २३ तीर्थंकर झाले आहेत. म्हणजेच जैन धर्म हा अतिशय प्राचीन, स्वतंत्र आणि स्वतःचे स्वतंत्र तत्वज्ञान जपणारा धर्म आहे. म्हणून जैन धर्म मुघल, इंग्रज आणि त्यानंतर कॉंग्रेसने फूट पाडून वेगळा झाला आहे असे अजिबात नाही.

जैन धर्माला मिळालेला अल्पसंख्यांक दर्जा हा आपल्या जैन धर्मियांचा घटनात्मक अधिकार असून घटनेतील कलम २९ व ३० (सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार) अंतर्गत विशेष तरतुदी नुसार तो प्राप्त झालेला आहे. हे मुलभूत अधिकार आपली भाषा, लिपी आणि संस्कृती जतन करण्याचा तसेच स्वतःच्या शैक्षणिक संस्था स्थापन व व्यवस्थापित करण्याचा अधिकार देतात. तसेच कलम २५ ते २८ अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्याचा मुलभूत अधिकार आपल्याला घटनेने दिला आहे.

घटनेतील कलम २९ व ३० (सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार) अंतर्गत विशेष तरतुदी नुसार अगोदर २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने व नंतर २०१४ मध्ये केंद्र शासनाने जैन धर्माला अल्पसंख्यांक म्हणून मान्यता दिली आहे. आणि विशेष म्हणजे याच्याही अगोदर घटनेनुसार जैन धर्म आणि त्यांच्या शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झालेला होता. तसेच जैन धर्माला अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त व्हावा म्हणून राज्यातील श्रीमान सुरेशदादा जैन, श्रीमान विजयजी दर्डा व श्रीमान शांतीलालजी मुथा यांच्यासारख्या व्यक्तींनी सातत्यपूर्ण पाठपुरावा व प्रयत्नांची शिकस्त करुन जैन धर्माला अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त करुन घेतला आहे.

तसेच जैन धर्म हा खूप धनाढ्य व पैसेवाला आहे हा जो गैरसमज समाजात पसरविला गेला आहे तो अत्यंत चूकीचा आहे. काही व्यक्ती या धनाढ्य आहेत, परंतु प्रत्यक्ष स्थिती बघितल्यास बहुतांश जैन धर्मीय व्यक्ती या छोटा-मोठा व्यवसाय अथवा नोकरी करुन चरितार्थ चालवीत आहेत आणि त्यांची संख्या जवळजवळ ९० ते ९५ टक्क्यांच्या आसपास आहे.

म्हणून जैन धर्माचा प्राचीन इतिहास, संस्कृती, परंपरा, तत्वज्ञान, घटनेने कायदेशीररित्या दिलेले अधिकार, अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त व्हावा म्हणून केलेले प्रयत्न, राज्य सरकार आणि केंद्र शासनाने घटनेतील तरतुदीनुसार दिलेला दर्जा आणि जैन धर्मिय बहुतांश व्यक्तींची आजची आर्थिक परिस्थिती या सर्व गोष्टींचा विचार केल्यास अल्पसंख्यांक दर्जा मागे घेण्याचा प्रश्नच येत नाही. उलट जैन धर्माला

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाल्यामुळे आज समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी खूप मोठा लाभ होत आहे.

म्हणून कृपया आपण जैन धर्म हा हिंदू संस्कृतीचा भाग आहे आणि त्याने अल्पसंख्यांक दर्जा सोडण्याचा विचार करावा या आपल्या मनातील विचाराचा त्याग करावा. तसेच अल्पसंख्यांक दर्जा मागे घेण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरु करण्याबाबतच्या आपल्या मनातील विचाराचाही त्याग करावा व भविष्यात अशी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया सुरु होणार नाही यासाठी प्रयत्न करावेत व जैन धर्माला अल्पसंख्यांक म्हणून घटनेने दिलेला अधिकार अबाधित कसा राहील यासाठी आपले बहुमोल योगदान द्यावे. तसेच आजही जैन समाजातील बरेच परिवार हे आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहेत त्यांच्या उत्थानासाठी आपण अधिकाधिक सहयोग द्यावा ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
बेबीलाल केशरमल संचेती
अध्यक्ष, एसएनजेबी (जैन गुरुकुल), चांदवड

**अल्पसंख्यक दर्जा छोड़ना यानी जैन तीर्थों और मंदिरों पर अतिक्रमण को बढ़ावा देना – जीवनदादा पाटील संस्थापक अध्यक्ष : सन्मति सेवा दल**

जैन समाज को अल्पसंख्यक श्रेणी से बाहर आने की सलाह देना, दरअसल अपने संवैधानिक अधिकारों का त्याग कर हमारे मंदिरों और तीर्थों पर हो रहे निरंतर अतिक्रमण पर अपनी ही मुहर लगाने जैसा है। यह कड़ा प्रहार सन्मती सेवा दल के संस्थापक अध्यक्ष श्री जीवनदादा पाटील ने कैबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा के बयान पर प्रतिक्रिया देते हुए किया।

श्री. जीवनदादा पाटील, कासारशिर्शी और प्रतिष्ठाचार्य पं. शैलेशभाई जैन, मांगीतुंगी ने संयक्त रूप से अपना पक्ष रखते हुए कहा कि अल्पसंख्यक दर्जा केवल राजनीतिक लाभ या अलग दिखने के लिए नहीं है। इसके पीछे के मुख्य कारण निम्नलिखित हैं:

संवैधानिक सुरक्षा कवच : जैन दर्शन, पूजन पद्धति और सिद्धांत अन्य संस्कृतियों से भिन्न और विशिष्ट हैं। इस प्राचीन संस्कृति को कालचक्र के प्रभाव से बचाने और इसके संरक्षण के लिए अल्पसंख्यक दर्जा एक अनिवार्य संवैधानिक कवच है।

तीर्थों का संरक्षण : वर्तमान समय में जैन तीर्थों और प्राचीन मंदिरों पर जिस प्रकार अतिक्रमण के प्रयास हो रहे हैं, ऐसी स्थिति में अपने अधिकारों का त्याग करना समाज के अस्तित्व को खतरे में डालने जैसा होगा।

अतिप्राचीन संस्कृति का संवर्धन:

जैन समाज ने यह दर्जा इसलिए प्राप्त किया है ताकि भारत की यह अतिप्राचीन और समृद्ध संस्कृति आने वाली पीढ़ियों के लिए अक्षुण्ण बनी रहे। राजनेताओं को नसीहत श्री लोढा के बयान पर टिप्पणी करते हुए पाटीलजी ने कहा कि लोढा जी एक वरिष्ठ राजनेता हैं और उन्हें अपने राजनीतिक लक्ष्यों को प्राप्त करने के लिए सबको साथ लेकर चलना चाहिए। लेकिन, राजनीति के चलते समाज के दूरगामी हितों और सांस्कृतिक सुरक्षा के साथ समझौता नहीं किया जा सकता। जैन समाज की ओर से यह स्पष्ट आव्हान किया गया है कि भविष्य की सुरक्षा और सांस्कृतिक पहचान बनाए रखने के लिए अल्पसंख्यक दर्जा अबाधित रहना ही चाहिए। इसके लिए सकल जैन समाज को एक विचार, एक आवाज से इसका खंडन करना चाहिए ऐसे विचार अंत में पं. शैलेशभाई जैन, मांगीतुंगी ने व्यक्त किये ।

## कव्हर तपशील - मे २०२६




❖ **भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव**

भगवान महावीर स्वामी यांचा २६२५ वा जन्म कल्याणक महोत्सव पुणे येथे भव्य कार्यक्रमात संपन्न झाला. श्री जैन सामुदायिक समिती तर्फे सकाळी भव्य शोभा यात्रा व संध्याकाळी गणेश क्रिडा हॉल येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. (बातमी पान नं. ९९)

❖ **नवकार मंत्र पठण – दिल्ली**

९ एप्रिल २०२६ रोजी जितो अ‍ॅपेक्स द्वारा भारतात व परदेशात अनेक ठिकाणी विश्व नवकार मंत्र पठणाचे आयोजन करण्यात आले होते. दिल्ली येथे गृहमंत्री अमितजी शाह यांच्या उपस्थितीत नवकार मंत्र जाप पठण करण्यात आले.
(बातमी पान नं. ७९)

❖ **जैन जागृति विशेषांक प्रकाशन**

जैन जागृति ''भगवान महावीर जन्म कल्याणक विशेषांक''चे प्रकाशन गणेश कला हॉल येथे सामुहिक उत्सव समिती तर्फे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात संपन्न झाले.
(बातमी पान नं. ९१)

❖ **जितो पुणे**

जितो पुणे तर्फे २० वा स्थापना दिवस व उत्कृष्टता सन्मान समारोह भव्य कार्यक्रमात पुणे येथे संपन्न झाले. (बातमी पान नं. ९४)

❖ **श्री जैन सकल संघ, पुणे जिल्हा**

श्री श्वेतांबर स्थानकवासी जैन सकल संघ पुणे जिल्ह्याची नवीन कार्यकारणीची घोषणा नुकतीच करण्यात आली. श्री. विलासजी राठोड यांची अध्यक्षपदी निवड झाली. (बातमी पान नं. ८०)

❖ **डायग्नोपिन – छ. संभाजीनगर शाखा उद्‌घाटन**

छ. संभाजीनगर येथे डायग्नोपिनच्या नवीन शाखेचा शुभारंभ कॅबीनेट मंत्री श्री. अतुलजी सावे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. (बातमी पान नं. ९७)

❖ **नगरसेविका सौ. मनीषा चोरबेले – अध्यक्षपदी**

पुणे मनपाच्या नगरसेविका सौ. मनीषा प्रवीणजी चोरबेले, बिबवेवाडी प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.
(बातमी पान नं. ९५)

❖ **नीळकंठ ज्वेलर्स, पुणे**

पुणे शहरातील नामांकित नीळकंठ ज्वेलर्स यांना इंडियन असोसिएशन फॉर गोल्ड एक्सलन्स अ‍ॅड स्टँडर्स (आयएजीईएस) या संस्थेकडून प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.
(बातमी पान नं. ९१)

**जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा**
**सर्वांत खात्रीशीर, सर्वांत सोपा व सर्वांत रिजनेबल मार्ग...**
**जैन जागृति – आजच जाहिराती व वर्गणी साठी संपर्क करा.**
**मो. : ९८२२०८६९९७, ८२६२०५६४८०**